| महाराष्ट्र पोलीस | **प्रसिध्दीपत्रक**<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,<br>पुणे-४११००६ | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

जा.क्र. / पोउआ / वाह / ३७८६ /२०२३ पुणे दिनांक - ३ /०७/२०२३

वारजे वाहतूक विभाग अंतर्गत येणारा मुंबई बेंगलोर हायवे वर चांदणी चौक येथे उड्डाणपुलाचे व रस्ता विकसनाचे काम चालू आहे. एनडीए पाषाण रोडवर ९ गर्डर्स बसविण्यात येणार आहे. गर्डर्स बसविताना मुंबई बेंगलोर हायवे वरील (एनडीए पाषाण रोड) वाहतूक बंद करणे आवश्यक आहे. याकरीता वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, दिनांक ०४/०७/२०२३ ते १५/०७/२०२३ पर्यंत रात्रौ ००.३० ते ०३.३० या कालावधीकरीता वारजे वाहतूक विभागातील वाहतूकीत तात्पुरत्या स्वरुपात बदलाबाबतचे खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**वारजे वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

- मुंबई बेंगलोर हायवे (एनडीए पाषाण रोड) वाहतूकीकरीता बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग (जड वाहने वगळुन फक्त हलकी / चारचाकी वाहनांकरीता) :-**

१. सातारा ते मुंबई हायवेची वाहतूक वेदभवन सर्व्हीस रोडने पुढे मुंबई कडे इच्छित स्थळी जाईल.

२. मुंबई ते सातारा वाहतूक पाषाण रोडला वळवून रँप क्रं. ६ वरून वारजेकडे इच्छित स्थळी जाईल.

(विजयकुमार मगर)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर